भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये **Rs. 100**

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

**महाराष्ट्र MAHARASHTRA** ◐ 2021 ◐ ZW 087080

कारण शैक्षणिक कामी सामंजस्य करार

ठिकाण :तहसिल आवार,हातकणंगले, परवाना क्र. २०/१७

वि. नं. ४५१२ एकूण मुद्रांक रु. १००/- पैकी मुद्रांक रु. १००/-

नांव मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हातकणंगले तारीख 25/03/2022

करिता- सुकुमार बाळु कुम्भार

सही-

सिकंदर उस्मान मुजावर
मुद्रांक विक्रेता, हातकणंगले.
कोड नं. 2607063

Sub Treasury Officer Hatkanangale.

21 MAR 2022

**सामंजस्य करार**

**(Memorandum of Understanding)**

**शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद (रजि.), कोल्हापूर, ४१६००४**

**आणि**

**मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले**

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद कोल्हापूर ही शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील इतिहासाचे शिक्षक, संशोधक आणि अभ्यासक यांची संघटन असलेली नोंदणीकृत संस्था आहे. ऐतिहासिक साधने, स्मारके व स्थळांचे जतन व संवर्धन करणे, इतिहासाचे दर्जेदार संशोधन, इतिहास विषयक ज्ञान प्रसार आणि जागृती करणे. तसेच त्यांचे विकसन करून त्याचे संशोधन करणे हे परिषदेचे ध्येय आहे. इतिहास विषयाच्या अध्यापनासंदर्भात विविध उपक्रम परिषदेमार्फत राबविले जातात. विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिषद, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे आणि कार्यशाळांच्या माध्यमातून बौद्धिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. इतिहासाचे शिक्षक, संशोधक, अभ्यासक व विद्यार्थ्यांना इतिहासाचे लेखन व संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन देऊन उत्कृष्ट शोधनिबंधाना पारितोषिके दिली जातात. परिषदेमार्फत 'इतिहास संशोधन पत्रिका' हे ISBN क्रमांक प्राप्त वार्षिक नियतकालिक प्रसिद्ध केले जाते. शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त यादीमध्ये या नियतकालिकेचा समावेश झालेला आहे.

**शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, कोल्हापूर आणि मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले, जि. कोल्हापूर** या संस्था एकमेकांबरोबर दि. ०७ एप्रिल २०२२ रोजी **सामंजस्य करार (MoU)** करीत आहे. या कराराची उद्दिष्टये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

**उद्दिष्टये:**

१) ऐतिहासिक साधने व स्थळांचे जतन व संवर्धन करणे.

२) चर्चासत्रे, कार्यशाळा, परिषद, परिसंवाद यांचे संयुक्त आयोजन करणे.

३) विद्यापीठस्तरीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.

४) दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये परिषदेचे दोन दिवसांचे वार्षिक अधिवेशन आयोजिन केले जाते. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विविध विषयांच्या समस्यांवर चर्चा करणे.

५) विविध विषयांवर संयुक्त संशोधन प्रकल्प राबविणे.

६) मोडी लिपी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

७) स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

८) व्यक्तिमत्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

९) ऐतिहासिक साधने या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), भारतीय इतिहास संशोधन परिषद (ICHR) यांच्या पर्यंत पोहचवण्यासाठी पत्र-व्यवहार करणे.

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे:**

१) परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२) विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३) उपलब्ध साधनसामग्रीनुसार या संस्थांकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४) त्रैमासिके, साहित्य, विचारांची देवाण-घेवाण करणे.

५) दरवर्षी परिषदेचे अधिवेशन विविध महाविद्यालयात आयोजित केले जाते. त्यामध्ये सदर महाविद्यालयातील शिक्षकांना सहभागी होण्यासाठी प्रवृत करणे.

**अटी:**

१) संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमांची आर्थिक तरतूद महाविद्यालयाने करण्याची आहे. वर्षातून किमान दोन कार्यक्रम संयुक्त विद्यामानातून घेणे बंधनकारक असेल.

२) परस्पर सामंजस्य करारातील अटींचे अथवा कराराचे नूतनीकरण करणे परस्परांच्या लेखी परवागीने करणे. साठ (६०) दिवसांच्या पूर्व-लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

३) दोघांपैकी कोणत्याही संस्थेस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

४) सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच (०५) वर्षे असून त्यानंतर हा करार संपुष्टात येईल.

५) परस्पर संमतीने आणखीन पाच (०५) वर्षांसाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

६) सामंजस्य करारापूर्वी परिषदेने प्रकाशित केलेली प्रकाशने महाविद्यालयाने घेणेची आहेत.

७) सामंजस्य कराराच्या माध्यमातून आयोजित कार्यक्रमात परिषदेचा लोगो वापरणे बंधनकारक असेल, कार्यक्रमापूर्वी परिषदेचे मा. अध्यक्ष अथवा मा. सचिव यांची लेखी परवानगी घ्यावी.

८) सामंजस्य कराराच्या माध्यमातून आयोजित संयुक्त कार्यक्रमात जातीय, धार्मिक, वांशिक स्तरावरील कार्यक्रमास अनुमती असणार नाही.

९) सामंजस्य कराराच्यापूर्वी संबधित महाविद्यालयातील इतिहास विषयाचे शिक्षक परिषदेचे आजीव सभासद असतील याची खात्री करावी.

**समन्वयः**

१) सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणी शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे मा. अध्यक्ष व सचिव हे करतील. तर महाविद्यालयाच्या वतीने मा. प्राचार्य, समन्वयक, विभागप्रमुख काम करतील.

२) सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीच्या अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंमलात येत आहे.

३) खाली स्वाक्षऱ्याचा सदरहू परस्पर सामंजस्य करार (MoU) हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यात होत आहे; तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

**प्रा. डॉ. एस. व्ही. सरवदे**
समन्वयक

**प्रा. डॉ. एन. ए. कुलकर्णी**
इतिहास विभाग प्रमुख

**प्रा. डॉ. वाय. व्ही. जुगळे**
प्राचार्य
प्राचार्य,
मा. श्री. आण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
कार्यवाह /खजिनदार
शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद कोल्हापूर.

**डॉ. भरतभूषण माळी**
अध्यक्ष
शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
कोल्हापूर.